ePaper

|वर्ष - 6 । अंक - 200 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।गुरुवार।दिनांक 3 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मोदींच्या गुजरातमध्ये विधानसभा निवडणुकीचं बिगुल वाजणार!




### आतील पानांत

- साखर निर्यात बंदीचा धसका
- 'महिंद्रा लॉजिस्टिक' च्या कर्मचाऱ्यांना १२ हजार ८०० रुपयांची पगारवाढ
- बल्क ड्रग पार्क विरोधात शेतकऱ्यांचा मोर्चा


## संजय गांधी निराधार योजना :

# चिंचवड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक लाभार्थी ! : शंकर जगताप

### संजय गांधी निराधार योजना समितीचे पदाधिकारी तळमळीने काम करत असल्याचे गौरवोद्गार

**। पिंपरी ।**

**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**राज्य सरकार श्रावण बाळ आणि संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत अपंग, विधवा महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच समाजातील वंचितांसाठी अनेक योजना राबवते. या योजनांचा लाभ घेणाऱ्यांची संख्या संपूर्ण महाराष्ट्रात चिंचवड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक आहे. योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी चिंचवड विधानसभा संजय गांधी निराधार योजना समितीचे सर्व पदाधिकारी तळमळीने काम करत आहेत, असे गौरवौद्गार भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांनी काढले.**



आमदार लक्ष्मण जगताप यांच्या मार्गदर्शनानुसार चिंचवड विधानसभा संजय गांधी निराधार योजना समितीच्या वतीने श्रावण बाळ व संजय गांधी निराधार योजनेच्या ५० लाभार्थ्यांना पेन्शनपत्राचे मंगळवारी (दि.१) वाटप करण्यात आले. त्यामध्ये ३० विधवा महिला, १० ज्येष्ठ नागरिक, ८ अपंग तसेच २ मूकबधीर व कर्णबधीर लाभार्थ्यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे या लाभार्थ्यांना मिठाई सुद्धा देण्यात आली. या शासकीय योजनेच्या लाभामुळे आमची दिवाळी गोड झाल्याचे समाधान लाभार्थ्यांनी व्यक्त केले.

यावेळी माजी महापौर माई ढोरे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, एकनाथ पवार, माजी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, माजी प्रभाग स्वीकृत सदस्य गोपाळ माळेकर, संदीप गाडे, चिंचवड विधानसभा संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष नरेंद्र माने, संजय गांधी योजना विभागाचे लिपीक भीमाशंकर बनसोडे, संजय मराठे, दिलीप गडदे, टाटा मोटर्सचे कामगार प्रतिनिधी नामदेव शिंत्रे, सामाजिक कार्यकर्त्या पल्लवी जगताप, कुंदा गडदे, रवि खोकर, पंकज सारसर आदी उपस्थित होते. शंकर जगताप म्हणाले, "समाजातील शोषित व वंचितांसाठी केंद्र आणि राज्य शासनामार्फत अनेक लाभाच्या योजना राबवल्या जातात. अनेक नागरिकांना या योजनांची पुरेशी माहिती नसते. त्यामुळे योजनांचा सामान्यांना लाभ मिळाला यासाठी सतत प्रयत्न करणे गरजेचे असते.

# 'पीएफ' इमारतीसाठी सर्वोतोपरी मदतीस तत्पर

### भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या भावना

**। पिंपरी ।**

**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

'इपीएफओ' कार्यालयाची सुंदर वस्तू निर्माण होणार आहे. त्याचा फायदा सर्व 'पीएफ' लाभधारकांना होणार आहे. माझे वडील 'एचए' फॅक्टरीमध्ये काम करत होते. माझे शिक्षण 'एचए' शाळेत झाले आहे. तसेच, ज्या जागेवर कार्यालय होणार आहे, तेथे पूर्वी आमचे घर होते. माझा जन्म येथेच झाला होता. ज्या ठिकाणी आपण भूमिपूजन करणार आहोत, तेथे माझ्या आईचे तुलसी वृंदावन होते. माझ्या



आईचे गेल्या महिन्यात निधन झाले आहे. येथे भूमिपूजनासाठी आल्याचा मला खूप अभिमान वाटत आहे. या इमारतीच्या उभारणीसाठी आणि पीएफ लाभधारकांना चांगली सेवा देण्याबाबत जी मदत लागेल, ती लोकप्रतिनिधी या नात्याने देण्यास कटिबद्ध आहे, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.

कर्मचारी भविष्य निधी संघटनेच्या (EPFO) पिंपरी येथे पुणे क्षेत्रीय कार्याल्याची केंद्रीय राज्य मंत्री भूपेंद्र यादव यांनी मंगळवारी सकाळी नवी दिल्ली येथून ऑनलाईन पद्धतीने पायाभरणी केली. त्यावेळी आरती अहुजा (आय.ए.एस, सचिव, कामगार आणि रोजगार मंत्रालय, केंद्र सरकार) व नीलम शमी राव (आय.ए.एस, केंद्रीय भविष्य निर्वाह निधी आयुक्त), एम.एस. के.व्ही.व्ही सत्यनारायण, (अतिरिक्त केंद्रीय भविष्य निधी आयुक्त, पुणे झोन), अमित वशिष्ठ (क्षेत्रीय भविष्य निधी, आयुक्त 1), के रवींद्र कुमार (क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त 1), मिलिंद पल्हाडे (व्यवस्थापक, हिंदुस्तान एंटीबायोटिक्स लिमिटेड), मनोज माने (क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त 2), आदित्य तलवारे (क्षेत्रीय भविष्या निधी आयुक्त 2) व भविष्य निधी संघटनेचे इतर कर्मचारी आणि अधिकारी उपस्थित होते.

### कशी असेल इमारत?

केंद्रीय रसायन आणि खते मंत्रालयाच्या हिंदुस्तान एंटीबायोटिक्स लिमिटेडकडून (एच.ए.एल) 3.5 एकर जमीन पुणे क्षेत्रीय कार्यालय इमारत आणि निवासी क्वार्टर्स बांधण्यासाठी घेण्यात आली आहे. केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग (सी पी डब्ल्यू डी) यांनी नियोजित कार्यालय इमारतीचे डिझाईन तयार केले आहे. या इमारतीत सात मजले आणि निवासी क्वार्टर्स असतील. त्यांचा एकूण बिल्टअप एरिया 31,770.43 चौमी असेल. ऊर्जेची बचत करण्यासाठी ग्रीन बिल्डिंग नियम पाळले जातील. दिव्यांगांच्या सोयीसाठी एक्सेस इंडिया स्कीम नियम पाळले जातील.

# मध्यवर्ती भागातील सात मार्ग पूर्ववत!

## प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी पीएमपीचा निर्णय

**।पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

मध्यवर्ती भागातील बाजीराव रस्ता आणि शिवाजी रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने मार्गांमध्ये पीएमपी प्रशासनाने केलेल्या बदलांवरून टीका झाल्यानंतर अखेर मध्यवर्ती भागातील सात मार्ग पूर्ववत करण्यात आले आहेत. मार्गांमध्ये बदल केल्याने विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदारांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन हा बदल करण्यात आला असून या निर्णयाची अंमबजावणी शुक्रवारपासून (४ नोव्हेंबर) होणार आहे. कात्रज ते शिवाजीनगर, सहकारनगरन ते संगमवाडी, स्वारगेट ते सांगवी, मार्केटयार्ड ते घोटावडे फाटा, नरवीर तानाजी वाडी ते सहकारनगर, अप्पर डेपो ते सुतारदरा आणि मार्केटयार्ड ते पिंपरी गाव हे मार्गावरील गाड्या पूर्वत दांडेकर पूल, शास्त्री रस्ता, फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता, शिवाजी रस्ता आणि येताना जंगली महाराज रस्त्याने डेक्कन मार्गे टिळक रस्त्याने धावणार आहेत. एकूण ३१ गाड्यांच्या माध्यमातून ३४४ फेऱ्या या मार्गावर होणार आहेत.



मध्यवर्ती भागातील बाजीराव रस्ता आणि शिवाजी रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या नावाखाली पीएमपीकडून बाजीराव रस्ता मार्गे संचलनात असलेल्या मार्गांमध्ये बदल केल्याने विद्यार्थी, नोकरदार आणि अन्य प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत होती. त्यावरून वाहतूक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था-संघटनांकडून पीएमपी प्रशासनावर टीका करण्यात आली. ऑगस्ट महिन्यात यातील काही मार्ग पूर्ववत करण्यात आले होते. मात्र आता पूर्ण मार्ग पूर्ववत करण्यात आल्याने विद्यार्थी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय होणार नाही, असा दावा पीएमपी प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

## कोंढव्यात बेकायदा हुक्का पार्लरवर छापा

### हुक्का पात्र, सुगंधी तंबाखू असा ६५ हजार २१० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**।पुणे। महाईन्यूज ।**



राज्य शासनाने बंदी घातल्यानंतर कोंढव्यातील दोन हॉटेलमध्ये बेकायदा सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर गुन्हे शाखेने छापा टाकला. पोलिसांनी केलेल्या कारवाईत हुक्का पात्र, सुगंधी तंबाखू असा ६५ हजार २१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने दोन हुक्का पार्लर चालकांच्या विरोधात कोंढवा पोलीस ठाण्यात दाखल केला आहे. कोंढव्यातील लॅविटेट हॉटेल, द ब्रेक रुम हॉटेलमध्ये बेकायदा हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती सामाजिक सुरक्षा विभागाला मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे कारवाई केली. दोन्ही हॉटेलमध्ये बेकायदा हुक्का पार्लर सुरू असल्याचे तपासात उघडकीस आले आहे. पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, सहआयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. सामाजिक सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कुंभार, सहायक निरीक्षक अश्विनी पाटील, राजेंद्र कुमावत, अजय राणे, प्रमोद मोहिते, मनीषा पुकाळे, अण्णा माने आदींनी ही कारवाई केली.

## रस्ते दुरुस्तीसाठी २१७ कोटींच्या खर्चाला पूर्वगणन समितीची मान्यता



**पुणे:** शहरातील रस्त्यांची दुरस्ती करण्यासाठी २१७ कोटींचा खर्च अपेक्षित असून त्याबाबतच्या खर्चाला महापालिकेच्या पूर्वगणन समितीने (इस्टिमेट कमिटी) मान्यता दिली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत रस्ते पूर्ववत करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. शहरात १ हजार ४०० किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. शहरात यंदा झालेल्या जोरदार पावसामुळे आणि सातत्याने रस्त्यांची खोदाई केल्याने रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली. एक हजार ४०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांपैकी एक हजार २०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे चित्र पुढे आले होते. त्यामुळे शहरातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी महापालिकेकडून शहरातील १३० रस्त्यांची तपासणी करण्यात आली होती. त्यानुसार आता रस्ते पूर्ववत करण्यासाठी पहिल्या टप्प्यात २०० पेक्षा जास्त रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येणार असून येत्या काही दिवसांत ५५ प्रमुख रस्त्यांची डागडुजी करण्यात येणार आहे. त्यासाठी २१७ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. त्याला पूर्वगणन समितीने मान्यता दिली आहे.

## राजकीय इच्छाशक्तीअभावी रुपी बँकेचा अस्त!


### बापट, पवार, फडणवीस सर्वांचे प्रयत्न अपयशी

**।पुणे । महाईन्यूज ।**

गेल्या २० वर्षांपासून रुपी सहकारी बँक ही विभागीय चौकशी, वसुली, वेगवेगळ्या बँकांचे विलीनीकरणाचे प्रस्ताव अशा फेऱ्यांमध्येच अडकली होती. त्यातून मार्ग काढत ही बँक वाचविण्यासाठी राजकीय पातळीवर फारसे जोमाने प्रयत्न झाले नाहीत. निदान या बँकेपुरते तरी भारतीय रिझर्व्ह बँकेपुढे कोणाचेच 'चलन' चालले नाही, केंद्रीय अर्थमंत्रालयही हतबल असल्याचे चित्र उभे करण्यात आले. केवळ बैठका घेऊन आश्वासने देणे आणि विलीनकरणाचे प्रयत्न सुरू आहेत असा शब्द देणे, यापेक्षा राजकीय नेतेमंडळींनी कोणतीही कृती केली नाही. राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे सर्व प्रयत्न दिखाऊ ठरल्याने बँकेचा बळी गेला आहे. मध्यमवर्गातील अनेकांनी आपल्या आयुष्याची कमाई या बँकेत मोठ्या विश्वासाने ठेवली होती. आता त्यांच्यापुढे फार मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. ही बँक इतिहासजमा होऊन बँकेवर अवसायक नेमण्याची प्रक्रिया होईपर्यंत काही बड्या राजकीय नेत्यांनी प्रयत्न सुरू असल्याचे खातेदार आणि गुंतवणूकदारांना दाखवून दिले होते.

### विलीनीकरणासाठी बँकांचे प्रस्ताव

रुपी बँक ही अन्य बँकांमध्ये विलीन करण्यासाठी वेगवेगळ्या बँकांचे प्रस्ताव आले. त्यामध्ये गुजरातमधील दि मेहसाणा अर्बन को. ऑप. ही प्रमुख बँक होती. २०१९ मध्ये हा प्रस्ताव आला होता. त्या प्रस्तावाचे पुढे काही झाले नाही. भारतीय रिझर्व्ह बँकेने तांत्रिक अटी घातल्याने त्यांनी काढता पाय घेतला. सारस्वत बँकेने डिसेंबर २०२१ मध्ये दिलेल्या प्रस्तावाला तत्त्वत: मंजुरी देण्यात आली. मात्र, त्याचवेळी भारतीय रिझर्व्ह बँकेने ठेव विमा संरक्षण योजनेनुसार पाच लाख रुपयांपेक्षा कमी रकमेच्या ठेवी असलेल्या खातेदारांसाठी ७०० कोटी रुपये दिले. त्यामुळे सारस्वत बँकेने निर्णय मागे घेतला. कॉसमॉस बँकेनेही प्रस्ताव दिला होता. राज्य सहकारी बँकेने दिलेला प्रस्ताव भारतीय रिझर्व्ह बँकेने सुमारे १९ महिन्यांनी नाकारला. प्रस्ताव येणे आणि मागे पडणे किंवा भारतीय रिझर्व्ह बँकेने नाकारणे, ही सगळी राजकीय खेळी 'बोलाचीच कडी आणि बोलाचाच भात' असल्यासारखी झाल्याने रुपी इतिहासजमा झाली.



केंद्रीय सहकार आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या ताब्यात असलेल्या गुजरातमधील दि मेहसाणा अर्बन को. ऑप. बँकेने विलीनीकरणाचा प्रस्ताव दिला; पण पुढे काही झाले नाही. बारामतीतील विद्या प्रतिष्ठान या संस्थेचे सुमारे तीन कोटी रुपये या बँकेत अडकले असल्याने माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी बँक वाचविण्यासाठी दिवंगत केंद्रीय मंत्री अरुण जेटली यांची भेट घेतली होती. त्यानंतर विद्यमान अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचीही भेट घेऊन चर्चा केली.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही व्हावी

# सर्व स्कूल बसचे 'फायर ऑडीट' करा!

### भाजपा वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दीपक मोढवे-पाटील यांचे उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना निवेदन

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड शहरात खासगी शाळा- महाविद्यालयांमध्ये सुरू असलेल्या सर्व स्कूल बसचे 'फायर ऑडीट' करावे. बसला आग लागल्याच्या घटना दिवसेंदिवस वाढू लागल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी भाजपा वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.

याबाबत वाहतूक विभागाचे सहायक पोलीस आयुक्त सतीश माने आणि पिंपरी-चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, एसटी, खासगी बस आणि काल शिवनेरी बसला आग लागल्याची घटना नुकतीच समोर आली. यापूर्वी ऑगस्ट महिन्यात पुण्यातील स्कूल बसला आग लागल्याची घटना घडली होती. दिवाळीच्या सुट्टया संपवून आता शहरातील शाळा- महाविद्यालये पुन्हा सुरू झाली आहेत. दिवसेंदिवस बस आणि खासगी गाड्यांना आगीच्या



घटनांची संख्या वाढत असल्यामुळे पालकांसह विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

विशेष म्हणजे, बहुतांश शाळांमध्ये खासगी ठेकेदारांकडून स्कूलबस सेवा पुरवली जाते. बसच्या सुरक्षेबाबत शाळा प्रशासन सतर्क असले तरी, आगीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर स्कूल बस सेवा पुरवठादारांची माहिती संग्रहित करुन सर्व गाड्यांचे 'फायर ऑडीट' करण्याबाबत कार्यवाही करावी. प्रत्येक मोठ्या बसमध्ये किमान २५ ते ३० विद्यार्थी प्रवास करतात. लहान स्कूल व्हॅनमध्ये आठ ते १० विद्यार्थी प्रवास करतात. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत शाळा प्रशासन आणि वाहतूक विभागाने सर्तकता बाळगली पाहिजे, अशी आमची मागणी दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.

#### अनधिकृत स्कूल व्हॅनला पायबंद घाला...

**स्कूल बस वाहतूक नियमावली धोरणानुसार सर्व बसेसची यांत्रिक व इतर स्थिती उत्तम असावी. शालेय बस नियम व विनियम २०१० अंतर्गत विहीत प्राधिकरणाने स्थिती प्रमाणित केलेली असणे बंधनकारक केले आहे. या बसेस पिवळ्या रंगाच्या असतील, तसेच बसेसच्या पुढे व मागे 'शालेय बस' असे ठळक अक्षरात लिहिलेले असावे. स्कूलबसेस नोंदणीपासून १५ वर्षांपेक्षा अधिक जुन्या नसाव्यात. मुंबईत ही मर्यादा ८ वर्षे आहे. तर सीएनजी बससाठी ही मर्यादा १५ वर्षे आहे. प्रत्येक बसमध्ये सुरक्षा दांडे, हाताने धरावयाचे कठडे, संकटसमयी बाहेर पडण्याचा मार्ग, प्रथमोचार संच, अग्निशमन यंत्र गरजेचे आहे. विशेष म्हणजे, अनधिकृतपणे स्कूल व्हॅन चालवल्या जात आहे. त्याला पायबंद घातला पाहिजे, अशी मागणीही दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.**

---

# १० हजार ८५३ सदनिकाधारकांना मिळाला पर्यावरण पूरक सवलतीचा लाभ

## सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांची माहिती

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि झिरो वेस्ट प्रकल्प राबवून पर्यावरणासाठी अमूल्य योगदान देणाऱ्या शहरातील 10 हजार 853 सदनिका धारकांना तब्बल 55 लाख रूपयांची घसघशीत अशी मिळकत कराच्या सामान्य करातून सवलत देण्यात आल्याची माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी दिली. तसेच शहरातील जास्तीत जास्त सोसायटीधारकांनी पर्यावरण पूरक सोसायट्या करून सवलत योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही देशमुख यांनी केले.**



पिंपरी-चिंचवड शहरात 5 लाख 82 हजार मिळकतींची नोंद आहे. चालू आर्थिक वर्षांत सुमारे चारशे कोटी रूपये कराचा भरणा केला आहे. ऑनलाइन कराचा भरणा, ऑनलाइन ना हरकत दाखला काढणे, ऑनलाईन मालमत्ता हस्तांतरण सुविधा, कराचा भरणा करण्यासाठी विविध WALLETS ची सुविधा उपलब्ध करून देणे यासह शहरातील मिळकत धारकांना महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागातर्फे अद्यावत अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे करदात्या नागरिकांना विना अडथळा कर भरणा करता येत आहे. तसेच करदात्यांसाठी विविध कर सवलतीही महापालिकेच्या वतीने देण्यात येत आहेत.

याबाबत माहिती देताना सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख म्हणाले, शहरातील 42 मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यामध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि झिरो वेस्ट प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या सोसायट्यांमध्ये 10 हजार 853 सदनिका आहेत. या सर्व सदनिका धारकांना तब्बल 55 लाखांची कर सवलत देण्यात आली आहे. या कर सवलतीमधून सोसायट्यांना त्यांचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि झिरो वेस्ट प्रकल्प राबविण्यासाठी 25 ते 50 टक्के रक्कम उभा राहिली. त्यामुळे शहरातील जास्तीत जास्त सोसायटीधारकांनी पर्यावरण पूरक सोसायट्या निर्माण करून सवलत योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहनही देशमुख यांनी केले आहे.

> **ऑनसाइट कंपोस्ट सवलत योजनेसाठी अर्ज करण्याची ऑनलाइन प्रक्रिया आहे. मात्र महापालिकेने स्वतःहून ही सवलत देणे आवश्यक वाटल्याने महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ज्या सोसायट्यांमध्ये पर्यावरण पूरक उपक्रम राबविले जातात, अशा सोसायट्यांची माहिती क्षेत्रीय कार्यालयांनी जानेवारी महिन्यांपर्यंत कर संकलन व कर आकारणी विभागाला द्यावी. कर संकलन विभागाने 1 एप्रिल रोजी नवीन बिलात सवलत देऊन बिल तयार करून लाभ द्यायचा आहे, असे आदेश दिले आहेत. त्याचबरोबर या सवलतींचा आढावा घेणे, या सवलतींमध्ये वाढ करता येणे शक्य आहे का? यासाठी आरोग्य विभाग प्रमुख आणि कर संकलन विभागाचे प्रमुखांनी एकत्रितपणे शक्यता पडताळून पहावी असेही आदेश दिले आहेत. हे शहर पर्यावरणपूरक, सर्वांगसुंदर, सुखद होण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**
>
> **– शेखर सिंह,**
> **आयुक्त तथा प्रशासक**

#### थेरगावात सर्वाधिक पर्यावरण पूरक सोसायट्या..

**पिंपरी-चिंचवड शहर चारही बाजूंनी वाढत असताना मोठ मोठ्या इमारती उभ्या राहत आहेत. मात्र, या इमारती उभ्या राहत असताना त्या पर्यावरण पूरक कशा होतील, यासाठी महापालिकेच्या वतीने प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्यामुळे सवलत योजनांमध्ये दिवसेंदिवस सोसायट्यांची संख्या वाढत आहे. थेरगावात 10 सोसायट्यामधून 1 हजार 904, पिंपरी वाघेरेतून 4 सोसायट्या मधून 1 हजार 877, वाकडमधून 6 सोसायट्यातून 1 हजार 664 तर चिंचवडमधून 7 सोसायट्यातून 1 हजार 416 सदनिकाधारकांना पर्यावरण पूरक सवलतीचा लाभ मिळाला आहे.**

#### 147 अर्ज नामंजूर..

**पर्यावरण पूरक सवलतीचा लाभ घेण्यासाठी शहरातील 147 सोसायटी धारकांनी महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाला ऑनलाइन अर्ज केले होते. मात्र, यामधील अनेक सोसायट्यांमध्ये ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा व एसटीपी कार्यान्वीत नसल्याचे समोर आले. त्याचबरोबर काही सोसायटी धारकांनी दुबार अर्ज केले आहेत, असे 147 अर्ज नामंजूर करण्यात आले.**

#### # अशी आहे सवलत सवलत योजना..

**१. ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा कार्यान्वीत असलेल्या निवासी आस्थापना (ओला कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या आस्थापना)- 5 टक्के**

**२. एसटीपी कार्यान्वीत असलेल्या निवासी आस्थापना – 3 टक्के**

**३. ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा व एसटीपी कार्यान्वीत असलेल्या निवासी आस्थापना – 8 टक्के**

**४. झिरो वेस्ट संकल्पना राबविणारी निवासी आस्थापना (ओला व सुका कचरा पूर्णतः जिरविणाऱ्या आस्थापना)- 8 टक्के**

**५. झिरो वेस्ट संकल्पना राबविणारी निवासी आस्थापना (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या आस्थापना) व एसटीपी असलेल्या निवासी आस्थापना – 10 टक्के**

#### अर्ज करण्याची अशी आहे प्रक्रिया

**गृहनिर्माण सोसायटींना पर्यावरण पूरक सवलतीचा लाभ घेण्यासाठी महापालिकेकडे सभासदांचे माहितीसह ऑनलाईन अर्ज सादर करावा लागतो. त्यानंतर क्षेत्रिय कार्यालयाचे संबंधित विभागामार्फत पर्यावरण पूरकच्या यंत्रणा सुस्थितीत आणि कार्यान्वित असल्याची खातरजमा करुन कर संकलन विभागास प्रमाणपत्र देण्यात येते. त्यानंतर कर सवलतीबाबत कार्यवाही करण्यात येते.**

## संपादकीय

# ‘गती’ पाविजेती...

***गाव आणि शहरांमधील अंतर कमी झाले की विकासाचा वेग आपोआप वाढतो. गावखेड्यातील किरकोळ दूधदुभत्यांचे थेट दुग्ध उत्पादन केंद्रांत रूपांतर होते.***

हे श्रेय असते दळणवळणाच्या आधुनिक साधनांचे. दुसरीकडे शहरांमधील सुविधा गावपातळीवर पोहोचल्याने लघुउद्योगांचीही व्याप्ती वाढते. महाराष्ट्रात १८ राष्ट्रीय महामार्गांखेरीज अनेक राज्य महामार्ग आहेत. ३३ हजार किलोमीटरहून अधिक लांबीच्या या रस्त्यांच्या अडचणीदेखील अवाढव्यच आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचे काम भव्य असते. साधारण उड्डाणेही कोटींच्या घरात नेण्यासाठी ते आसुसलेले असतात. त्यांच्या कल्पकतेचा पैस इथेनॉल निर्मितीपासून आरटीओ शुल्कापर्यंत झळकतो. आवेगी घोषणांखेरीज त्यांना चैन पडत नाही. राज्यातील रस्त्यांच्या पुनर्बांधणी आणि विस्तारीकरणासाठी दोन हजार ७८० कोटींचा निधी त्यांनी मागच्या वर्षी मंजूर केला. त्यांच्या खात्यात निधीला तोटा नाही. मजबूत रस्ते, दणकट वाहने हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यांची आकडेवारी संसदेला स्तब्ध करते. २५ हजार कोटींचे रस्ते वर्षभरात बांधण्याचे शिवधनुष्यही उचलले आहे. त्यासाठी रोख्यांच्या माध्यमातून २५ लाख कोटींचा निधी उभारण्याची विशाल योजना आखली आहे. दृढ निश्चयाखेरीज हे साधणे अशक्य आहे. या झपाट्याचे एकीकडे कौतुक करतानाच प्रशासकीय अडचणींमुळे त्यांना भानावर आणण्याचे कामही लोकांना करावे लागेल. मुहूर्त आणि पूर्ततेतील तफावत लक्षात घेऊन त्यांनी नव्या घोषणा कराव्यात, हीच लोकमागणी आहे.

नागपूर-पुणे महामार्गाचे अद्ययावतीकरण करून फक्त आठ तासात हे अंतर कापण्याचा संकल्प त्यांनी नुकताच जाहीर केला. गतीचा नवनिर्धार पूर्णत्वास गेला तर वाहतूकदारांना दिलासा मिळेल. प्रगतीचा वेग काय असतो याची चाहूल समृद्धी महामार्गाने सामान्यांपर्यंत नेली आहे. अशा स्थितीत नागपूर-पुणे प्रवासाचे सहा तास कमी झाले तर दळणवळण क्रांती ठरेल. सध्या या प्रवासावर चौदा तास खर्च होतात. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाला औरंगाबादजवळ नव्या प्रस्तावित पुणे-औरंगाबाद एक्सेस कंट्रोल ग्रीन एक्सप्रेस-वे द्वारे जोडण्याचा त्यांचा मानस आहे. त्यातून मराठवाड्यातील लोकांसाठी पुण्यासह नागपूरही कवेत येईल. राष्ट्रीय महामार्गाकडून या मार्गाचे काम होणार असल्याने पुणे-औरंगाबाद प्रवास अवघ्या अडीच तासांत होईल. पुणे, अहमदनगर, बीड आणि औरंगाबाद या चार जिल्ह्यांतून हा जलदगती महामार्ग जाईल. समृद्धी महामार्गाद्वारे नागपूर-औरंगाबाद प्रवास साडेपाच तासांत पूर्ण करता येईल. अर्थात, ही किमया अपार कष्टातूनच साध्य होईल. अधिकारी आणि आंदोलक अशा दोन्ही पातळीवर केंद्र आणि राज्याला लढावे लागेल. कोणत्याही प्रकल्पाच्या मार्गात अनेक अदृश्य शत्रू असतात. प्रकल्पांच्या घोषणेनंतर ते तोंड वर काढतात. अशाच प्रकारच्या समस्यांमुळे देशातील अडीचशेहून अधिक प्रकल्पांचे काम सद्यस्थितीत रेंगाळले आहे.

# माझे बाबा ! : प्रा.रामकृष्ण मोरे!!



**महाराष्ट्र राज्याचे दिवंगत माजी शिक्षणमंत्री, पुणे जिल्ह्याचे काँग्रेस (आय) पक्षाचे नेते व पिंपरी-चिंचवड शहराचे शिल्पकार प्रा.रामकृष्ण मोरे यांचा आज 19 वा स्मृतीदिन. त्यांच्या जीवन कार्यावर येत्या डिसेंबरमध्ये ‘परामर्श एका शिल्पकाराचा’ या नावाचा ग्रंथ प्रकाशित होत आहे. ज्येष्ठ पत्रकार व लेखक विजय जगताप यांनी संपादन केलेल्या या ग्रंथात प्रा. मोरे यांची अमेरिका स्थित कन्या डॉ. स्नेहल मोरे यांनी आपल्या वडिलांविषयी लिहिलेला हा विशेष लेख प्रकाशनापूर्वीच खास महाईन्यूजच्या वाचकांसाठी...**

4 डिसेंबर 1982 या दिवशी माझा जन्म झाला. खासदार असलेले माझे बाबा तेव्हा दिल्लीत होते. तेथे एशियन गेम्स सुरु होत्या. मी जन्मल्याचा निरोप जाताच दिल्ली सोडून तातडीने बाबांनी मला पाहण्यासाठी पुण्यात धाव घेतली. बाबाचा माझ्यावर असलेला जीव तसा जन्मापासूनच....!

मी पाच वर्षांची असेन बहुधा..मला आठवतंय, आमच्या घरी सकाळपासून रात्री उशिरापर्यंत कार्यकर्त्यांची सततची गर्दी हमखास ठरलेली..! कालांतराने या गर्दीची आम्हाला सवय झाली. माझी आई जैविक रसायन शास्त्र या विषयाची प्राध्यापक तर बाबा मराठीचे प्राध्यापक होते. शिवाय दोघांनाही वाचनाची प्रचंड आवड असल्याने आमच्या घरातील एक खोली तुडुंब पुस्तकांनी भरलेली होती. घरातील या ग्रंथालयामध्ये बाबा रात्री कितीही उशिरा घरी आले तरी तासन् तास वाचत बसायचे.



**विशेष**

**शब्दांकन : विजय जगताप**

कितीही व्यस्त असले, तरी माझ्या रिपोर्टचे दिवशी मात्र ते हमखास शाळेत यायचे. माझ्या शिक्षकांशी पडलेल्या मार्कांविषयी व अभ्यासातील प्रगतीबद्दल चर्चा करत. माझे मित्र-मैत्रिणी कधी कधी आमच्या घरी आल्यानंतर तर ते अधिक खुलत. सर्वांना ते खाऊ द्यायचे शिवाय प्रत्येकाची चौकशी करत सगळ्यांना हसवून सोडत असत.

ते फार गोड व प्रेमळ होते. संसदेचे असो की विधानसभेचे हिवाळी अधिवेशन हे नेहमी माझ्या वाढदिवसाच्या दरम्यानच सुरू व्हायचे. मग एका दिवसासाठी हमखास सभागृहाची परवानगी घेऊन माझ्या वाढदिवशी ते घरात थांबत. मग घरातील खोली सजवणे, वाढदिवसाची तयारी करणे ही कामे करायला त्यांना फार आवडत असे. घरात सहज बोलताना देखील ते जीवनाविषयीचे तत्त्वज्ञान, मानवी जीवनात येणारी संकटे-अडचणी कशा सोडवायच्या? त्यावर कशी मात करायची? याचे नकळत धडे ते आम्हाला देत. त्यावेळेस हे जड जड विचार माझ्या डोक्यावरून जाई, मात्र जसजसे वय वाढत जाई तसतसे ते देत असलेल्या जीवनाचा मूलमंत्र मला पटू लागायचा.

चांगला अभ्यास करून मी खूप शिकावं, डॉक्टर व्हावं, असं ते बोलून दाखवत. वास्तविक खरं तर त्यांनाच डॉक्टर व्हायचं होतं, परंतु घरची परिस्थिती तशी नसल्याने त्यांना डॉक्टर होता आलं नाही. ‘मी जर डॉक्टर झालो असतो तर खूप चांगल्या प्रकारे रुग्णांची सेवा केली असती ‘असे ते म्हणत. देश एका चांगल्या डॉक्टरला मुकला अशीही ते खंत बाळगत. त्यामुळेच की काय, आपले स्वप्न ते माझ्या रूपात पाहत. देव आनंद हा त्यांचा आवडता हिरो असे, त्यामुळे त्याच्यासारखी हेअर स्टाईल करायला त्यांना आवडायची. चांगला पिक्चर, चांगली नाटके आली, की ते आम्हाला मुद्दाम पाहायला घेऊन जात, तिथून घरी येताना फर्ग्युसन रोडवरील रूपाली तर कधी वैशाली या हॉटेलमध्ये जाऊन पेट पुजा करणं, हा आमचा ठरलेला फिक्स कार्यक्रम असे.

हॉटेल मॅनर्स, काटे व चमच्याने कसे खायचे? स्टाईलमध्ये कॉफी कशी प्यायची? वेटरशी सन्मानाने कसं बोलायचं? याचे ते नकळतपणे आम्हाला धडे द्यायचे. कारमधून त्यांच्या बरोबर फिरताना पुण्यातील झोपडपट्ट्यांमधील मुले- मुली पाहताना तसेच प्रतिकूल परिस्थितीवर मात करत लाईटचे खांबाच्या उजेडात अभ्यास करून यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा त्यांना भारी अभिमान वाटायचा. सिग्नलवर भीक मागताना लहान मुले दिसली तर त्यांना अस्वस्थ व्हायचे. आमच्या घरी नुसते कार्यकर्तेच नाही तर विविध क्षेत्रातील विविध वयोगटातील जे लोक येत त्या प्रत्येकाला प्रोत्साहन देणे, आत्मविश्वास देणे त्यांना आवडे. एकदा भेटलेली व्यक्ती नंतर पुन्हा कितीही वर्षांनी भेटली तरी ते त्वरित ओळखत.

**- डॉ. स्नेहल मोरे -जाधव**

अमेरिका

# नवा अंकुश

**समाज माध्यमांबाबत ती वापरणाऱ्यांच्या तक्रारींच्या निवारणासाठी विविध समित्या नेमण्याचा केंद्र सरकारच्या निर्णयावर भाष्य करताना त्याची पार्श्वभूमी पाहणे महत्त्वाचे ठरते.**

समाज माध्यमांमुळे सर्वसामान्यांना अभिव्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे यात शंका नाही. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक अशा विविध क्षेत्रांतील घटना घडामोडींबद्दल प्रत्येकाचे स्वतःचे म्हणून एक आकलन असू शकते. ते त्यांना मांडता येणे किंवा त्याद्वारे इतरांवर प्रभाव टाकणे समाज माध्यमांमुळे शक्य होते. त्यामुळे समाज माध्यमांवर विविध प्रकारच्या मतप्रवाहांचा कोलाहल असणे स्वाभाविकच. लोकशाहीतच मतभिन्नता स्वागतार्हच असते. म्हणूनच समाज माध्यमे लोकशाहीला पूरकच ठरतात. मात्र, आपले मत इतरांवर लादण्यासाठी खरे आणि खोट्याचे बेमालूम मिश्रण करणाऱ्यांमुळे, द्वेष फैलावून समाजात फूट पाडणाऱ्यांमुळे आणि बीभत्स धंदेवाईक वृत्ती असलेल्यांमुळे समाज माध्यमे अशांतता निर्माण करण्याला, ऐक्याला तडे देण्यालाही कारणीभूत ठरत आहेत. सामाजिक,




सांस्कृतिक आणि राजकीय हितसंबंधी मंडळींच्या कारवायांमुळे ही नवी माध्यमे समाजासाठी आणि देशासाठी धोकादायक ठरण्याची भीती आहे. त्यांच्या नियमनाची आवश्यकता भासते, ती यासाठी. याबाबत वेळोवळी कायदे केले गेले. खुद्द समाज माध्यमांनाच अधिक उत्तरदायी बनविण्यासाठी प्रयत्न झाले. कुप्रवृत्तींकडून आपला गैरवापर होणार नाही यासाठी; तसेच खातेधारकांच्या तक्रारींच्या निराकरणासाठी या माध्यमांना अंतर्गत व्यवस्था करणेही भाग पाडले गेले. समाजात द्वेष पसरविणाऱ्यांपासून समाज विघातक कारवायांना उद्युक्त करणाऱ्यांपर्यंत सर्व अपप्रवृत्तींना रोखण्याचा प्रयत्न झाला खरा; परंतु अपप्रवृत्ती काही कमी झाल्या नाहीत. या माध्यमांचा गैरवापर कायमच राहिला आहे. माहिती तंत्रज्ञान कायद्यात नव्याने दुरुस्ती करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय होण्याला ही पार्श्वभूमी आहे.

या कायद्यातील दुरुस्तीनुसार, तक्रारींच्या निराकरणासाठी विविध प्रकारच्या समित्या (जीएसी) पुढील तीन महिन्यांत स्थापल्या जातील. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू ट्यूब आदी विविध समाज माध्यमांबद्दल या समित्यांकडे थेट तक्रार करण्यात येणार आहे. एक अध्यक्ष आणि दोन स्थायी सदस्य यांचा समावेश असलेल्या समित्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी तज्ज्ञांची मदत घेऊन निकाल देणार आहेत. त्यांचे पालन करणे संबंधित माध्यमांना बंधनकारक असेल. द्वेषमूलक, प्रक्षोभक किंवा समाजात फूट पाडण्यासाठी समाज माध्यमांचा वापर करणाऱ्यांचे खातेही बंद करण्याचा आदेश या समित्या देऊ शकतात.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥


**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 15 वॉर्डमध्ये 'स्वच्छ मुंबई स्वस्थ मुंबई' अभियान राबवणार

## ऑक्टोबरमध्ये झालेल्या नुकसानचीही मिळणार भरपाई; त्वरीत पंचनामे करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

। मुंबई ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



'स्वच्छ मुंबई स्वस्थ मुंबई अभियान मुंबई उपनगर जिल्ह्यातील १५ वॉर्डमध्ये १ ते ३१ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे. शासनाचे सर्व विभाग, स्वयंसेवी संस्था, विविध सामाजिक कार्य करणाऱ्या संघटना तसेच नागरिकांनी या अभियानात श्रमदान करून हा उपक्रम यशस्वी करूया असे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

'स्वच्छ मुंबई स्वस्थ मुंबई अभियान 'या विषयी मुंबई महानगर प्रदेश विकास चे कार्यालय येथे पूर्व तयारी बाबत आयोजित बैठकीत मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा बोलत होते.यावेळी मुंबई उपनगर च्या जिल्हाधिकारी निधी चौधरी,मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त आशिष शर्मा, मुंबई महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन अधिकारी चंदा जाधव, विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. सुभाष दळवी,जिल्हा नियोजन अधिकारी भूषण देशपांडे यासह विविध शासकीय विभागांचे अधिका-यांबरोबरच विविध क्षेत्रातील सामाजिक संस्था, एनजीओ, असोसिएशनस्चे पदाधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, हे अभियान मुंबई महापालिका मार्फत राबविण्यात येणार असून त्यामध्ये सर्व शासकीय/निमशासकीय/ खाजगी संस्थाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.मुंबई उपनगरातील पंधरा वॉर्ड मध्ये सामाजिक कार्य करणाऱ्या संघटना, स्वयंसेवी संस्था, शासनाचे सर्व विभाग, नागरिक यांना ज्या ज्या वॉर्डमध्ये शक्य होईल तिथे आपला परिसर, शाळा, महाविद्यालय, पोलीस स्टेशन, सार्वजनिक ठिकाणे, सागरी किनारे यांची स्वच्छता करावयाची आहे.

प्रत्येकाने 1 ते 31 डिसेंबर २०२२ या अभियान कालावधीत प्रत्येक शनिवार, रविवारी जेवढा वेळ श्रमदान करता येईल त्या सर्वांनी संबंधित वॉर्ड निहाय स्वच्छतेचे उपक्रम राबवता येतील. प्रत्येक संस्था त्यांना ज्या प्रकारे या उपक्रमात सहभाग घेणे शक्य आहे याची माहिती वॉर्ड ऑफिसर यांना द्यावी.शाळा महाविद्यालयामध्ये जनजागृती पर कार्यक्रम देखील घेता येतील. विविध सामाजिक संघटना त्यांना शक्य असेल त्या सोयीच्या ठिकाणी श्रमदान करू शकतील. सर्व सार्वजनिक ठिकाणे जसे की रस्ते, पदपथ, रेल्वे प्लॅटफार्म, उद्याने, मंडया, सार्वजनिक शौचालये, स्वच्छतागृहे, शाळा, महाविद्यालये, शासकीय/ निमशासकीय कार्यालये, बीचेस, पर्यटन स्थळे, फ्लायओव्हर इत्यादी ठिकाणांची मिशन मोडमध्ये काम करता येईल.

जिल्हाधिकारी निधी चौधरी म्हणाल्या, मुंबई उपनगर जिल्ह्याअंतर्गत येणाऱ्या शाळा महाविद्यालय, सर्व गृहनिर्माण सोसायट्या,सर्व रुग्णालये, सार्वजनिक ठिकाण, प्रत्येक शासकीय विभागाच्या अंतर्गत हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. जनजागृती पर उपक्रम राबवणे, स्वच्छतेचे संदेश देणे, सागर किनारे स्वच्छ करणे, स्वच्छता अभियान राबवणे ज्या वॉर्डमध्ये असे उपक्रम राबवण्यासाठी प्रत्येक संस्थेला शक्य आहे तिथे त्यांनी मदत करावी. प्रत्येक शासकीय विभागांनी आपल्या अखत्यारीतील यंत्रणांना याची माहिती द्यावी. १ ते ३१ डिसेंबर या कालावधीत प्रत्येक दिवसाचा उपक्रम काय असेल याची माहिती सर्वांना कळविण्यात येईल.

# "वेडात मराठे वीर दौडले चाळीस"

## राज ठाकरेंची मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसमोर मिश्कील टिप्पणी

।मुंबई । महाईन्यूज ।



दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या 'वेडात मराठे वीर दौडले सात' या आगामी चित्रपटानिमित्त आयोजित कार्यक्रमात आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे पुन्हा एकाच व्यासपीठावर दिसून आले. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर 'वेडात वीर मराठे दौडले चाळीस', अशी मिश्वील टीप्पणी केली. यावरून उपस्थितांमध्ये हशा पिकला.. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी केलेल्या बंडखोरीवरून मुख्यमंत्र्यांचा उल्लेख "वेडात वीर मराठे दौडले चाळीसचे निर्माते, दिग्दर्शक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे", असा केला. त्यावरून उपस्थितांमध्ये हशा पिकला होता. पुढे बोलताना त्यांनी महेश मांजरेकर यांचे कौतुकही केले. "कोणी वेड्याने धावणारा असेल तर ते महेश मांजरेकर आहेत. प्रत्येकवेळी ते नवं आणि भव्य स्वप्न घेऊन येतात. 'वेडात वीर मराठे दौडले सात' या चित्रपटाबाबत मला महेश मांजरेकरांनी पाच वर्षांपूर्वी माहिती दिली होती. आज मराठीतला सर्वात मोठा चित्रपट तुमच्यापुढे येत आहे. आज मराठी चित्रपटसृष्टी पुढे जाते आहे. त्याचं मोठं क्षेत्र, महेश मांजरेकरांना जाते", अशी प्रतिक्रिया राज ठाकरे यांनी दिली.

# येत्या दोन वर्षांत भारतातील नागरिकांना हायड्रोजन कार वापरता येणार

## नितीन गडकरींची माहिती

।वाई । महाईन्यूज ।



वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यावरही नितीन गडकरींनी भाष्य केलं आहे. भारतात हायड्रोजन कारमध्ये वापरण्यासाठी बायो इंधन तयार केले जात आहे. यासाठी कचऱ्याचा वापर होतोय. परंतु आपल्याला इंधन आयात करण्याची गरज नाही. भविष्यात भारत बायो इंधन निर्यात करेल, असंही गडकरी म्हणाले.

भारतात लवकरच येत्या काही वर्षांत हायड्रोजन इंधनावर चालणारी गाड्या धावताना दिसणार आहेत. तसेच पुढील दीड ते दोन वर्षांत भारतातील नागरिकांना हायड्रोजन कार वापरता येणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. एका आयोजित अवॉर्ड्स शोमध्ये नितीन गडकरी बोलत होते.

वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यावरही नितीन गडकरींनी भाष्य केलं आहे. भारतात हायड्रोजन कारमध्ये वापरण्यासाठी बायो इंधन तयार केले जात आहे. यासाठी कचऱ्याचा वापर होतोय. परंतु आपल्याला इंधन आयात करण्याची गरज नाही. भविष्यात भारत बायो इंधन निर्यात करेल, असंही गडकरी म्हणाले.

आता लवकरच बायो इंधनावर गाड्या चालतील. येत्या दीड ते दोन वर्षांत भारतातील लोकं हायड्रोजन कार चालवू शकतील. प्रतिकिलो हायड्रोजन ८० रूपयांत मिळावा यासाठी माझा प्रयत्न आहे. १ किलो हायड्रोजनमध्ये ४०० किमी धावू शकते, असंही गडकरी म्हणाले.

सध्या हायड्रोजन तीन प्रकारे बनवले जात आहे. काळा हायड्रोजन, तपकिरी हायड्रोजन आणि ग्रीन हायड्रोजन असं आहे. हायड्रोजन कचरा, सांडपाणी आणि पाण्यापासून बनवता येतो.

# राज्य सरकारचा शेतकऱ्यांना दिलासा, ऑक्टोबरमध्ये झालेल्या नुकसानचीही मिळणार भरपाई

।मुंबई । महाईन्यूज ।



राज्यातील शेतकऱ्यांना पावसामुळे झालेल्या नुकसानभरपाईपोटी आत्तापर्यंत ४७०० कोटी रुपयांची वाढीव दराने मदत दिल्यानंतर आता ऑक्टोबर महिन्यात पावसाने झालेल्या नुकसानीसाठीसुद्धा मदत देण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. तसेच नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे लवकरात लवकर संपावावेत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आले आहेत. "प्राथमिक अंदाजानुसार ऑक्टोबरमध्ये झालेल्या पावसामुळे सुमारे २५ लाख हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले आहे. आजपर्यंत कधीही सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिली जात नव्हती. मात्र, आमच्या सरकारने प्रथमच अशा शेतकऱ्यांना वाऱ्यावर न सोडता दिलासा देण्याचा निर्णय घेतला असून यासाठी सुमारे ७५० कोटी रुपये इतके वाटप करण्यात आले आहे. ऑक्टोबर महिन्यात झालेला सततचा पाऊस आणि नुकसानीसाठी हेच निर्णय लागू करण्यात येणार आहेत. आम्ही महसूल आणि कृषी विभागाला निर्देश दिले होते, त्याप्रमाणे सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे वेगाने सुरू असून यासंदर्भात प्रशासनाला सूचना दिल्याची माहिती", मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे या शेतकऱ्यांचे पंचनामे लवकरात लवकर संपावावेत, असे निर्देश देण्यात आले असल्याचेही ते म्हणाले.

# शिवसेनेतील फूट प्रकरणावर 29 नोव्हेंबरला अंतिम सुनावणी होणार!

## फूट प्रकरणावर डिंसेबरपूर्वी अंतिम निकाल येण्याची शक्यता कायदेतज्ज्ञांनी वर्तवली

**।मुंबई ।महाईन्यूज ।**

राज्यातील सत्तासंघर्ष, शिवसेनेतील फूट आणि आमदारांची अपात्रता आदी मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती डॉ. धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठापुढे आज ( १ नोव्हेंबर ) सुनावणी पार पडली. मात्र, घटनापीठाने दोन्ही पक्षकारांना लिखित



बाजू मांडण्यास सांगितलं आहे. त्यासाठी तीन आठवड्यांची मुदत दिली असून, २९ नोव्हेंबरला याप्रकरणी सुनावणी होणार आहे. या सुनवणीकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. यावरती कायदेतज्ज्ञ असीम सरोदे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

असीम सरोदे यांनीही सर्वोच्च न्यायालयात मतदारांच्यावतीने हस्तक्षेप याचिका दाखल केली आहे. न्यायालयाने त्यांची याचिका मान्य केली असून, त्यांचं मतं ऐकून घेतलं आहे. यानंतर असीम सरोदे यांनी न्यायालयाच्या सुनावणीवर भाष्य केलं आहे. असीम सरोदे म्हणाले, “ठाकरे गट आणि शिंदे गटाने लेखी युक्तीवाद दाखल करायला हवे, असं न्यायालयाचे मतं होतं. त्यानुसार दोन्ही पक्षकारांनी ४ आठवड्यांचा वेळ मागितला असून, २९ नोव्हेंबरपर्यंत मत सादर करण्यात येईल. २९ नोव्हेंबरला अंतिम सुनावणी होईल, अशा स्वरूपात न्यायालयाने मत व्यक्त केलं आहे. पण, त्याची शक्यता धूसर आहे.” “कारण, अरुणाचल प्रदेशच्या प्रकरणात पाच न्यायाधिशांच्या खंडपीठाने निर्णय दिला होता. तो ओलांडून पुढचा विचार करायचा असेल तर, सात न्यायाधिशांच्या खंडपीठाची आवश्यकता आहे. तशी मागणीही केली जाऊ शकते. तसे झाले तर घनापीठांचे पुनर्गठन होत पुन्हा सुनावणी सुरु होणार. त्यामुळे सुनावणी लांबणीवर जाऊ शकते. परंतु, डिसेंबरपूर्वी अंतिम निकाल लागेल,” असा विश्वास असीम सरोदे यांनी व्यक्त केला आहे.मुंबई पालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी निकाल लागेल का? यावरही सरोदे यांनी मत व्यक्त केलं आहे. “निवडणुकीपूर्वी निकाल लागला पाहिजे. कारण, शिवसेना कोणाची हा तात्पुरता आदेश देण्यात आला आहे. यावरती निवडणुका पार पडणे लोकशाहीच्या हिताचे नाही. त्यामुळे लोकशाहीचं आरोग्य टिकवण्यासाठी लवकरात लवकर निर्णय होऊन स्पष्टता आली तर, मतदार आणि नागरिकांच्या मनातील संभ्रम दूर होईल,” असं असीम सरोदे यांनी स्पष्ट केलं आहे.

# राहुल गांधींच्या नेतृत्वातील सरकार केंद्रात हवे

## मल्लिकार्जुन खर्गेंचे विधान

**।मुंबई ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा (bharat jodo yatra) सुरु आहे. लवकरच ही यात्रा महाराष्ट्रात सुद्धा दाखल होणार आहे. दरम्यान मल्लिकार्जुन खर्गे यांनी काँग्रेच्या (congress) अध्यक्ष पदाची धुरा हाती घेतल्या नंतर ते काल 1 नोव्हेंबर रोजी पहिल्यांदाच भारत जोडो यात्रेत सहभागी झाले होते. भारत जोडो यात्रेदरम्यान हैद्राबादमध्ये सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी बोलताना ”केंद्रात गैर – भाजप सरकार स्थापन करायचे असेल तर ते केवळ काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वामधील सरकार असेल” असे विधान काँग्रेसचे नवनिर्वाचीत अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केले.

दरम्यन यावेळी बोलताना मल्लिकार्जुन खरगे यांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्यावरही टीकेजची तोफ डागली. “आम्ही संसदेत जेव्हा एखाद्या विधेयकाला विरोध करतो, त्याचवेळी



टीआरएसकडून त्याचे समर्थन केले जाते, तर दुसरीकडे केंद्रात गैर-भाजप सरकार स्थापन करण्याचा प्रयत्नसुद्धा ते करतात. मात्र, जर केंद्रात जर गैर-भाजप (bjp) सरकार स्थापन करायचे असेल तर ते केवळ राहुल गांधी यांच्या नेतृत्वामधील काँग्रेस सरकार असेल”, अशी वक्तव्य मल्लिकार्जुन खर्गे यांनी केले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीसुद्धा टीआरएसवर जोरदार टीका केली. “तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव हे थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संपर्कात असतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केसीआर यांना फोनवरून आदेश देतात”. असंही राहुल गांधी म्हणाले.

विरोधकांच्या मुद्द्यावरून लक्ष हटवण्याचे काम टीआरएसकडून संसदेत केले जाते तेलंगणाचे

# मोरबी दुर्घटना : कंत्राटदार कंपनीची अडवणूक आणि प्रशासकीय

## सुमारे 350 दशलक्ष वर्षांपूर्वी मंगळ या लाल ग्रहाच्या पृष्ठभागावर एक विशाल महासागर होता अस्तित्वात

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

गुजरातच्या मोरबी पूल दुर्घटनेला पुलावरील गर्दी किंवा जमलेल्यांपैकी काहींच्या बेजबाबदारपणा कारणीभूत असल्याची चर्चा जरी असली तरी, प्रत्यक्षात कारण वेगळेच आहे. ही दुर्घटना म्हणजे स्थानिक प्रशासन आणि ठेकेदार कंपनीदरम्यान गेल्या दोन वर्षांपासून असलेल्या वादाचा परिपाक असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यातही प्राथमिकदृष्ट्या तरी संबंधित कंत्राटदार कंपनीची अडवणूक आणि प्रशासकीय दिरंगाई दिसते.

पुलाची देखभाल आणि दुरुस्तीचे काम पाहणाऱ्या ओरेवा कंपनीने जानेवारी 2020मध्ये मोरबीच्या जिल्हाधिकाऱ्यांना लिहिलेले पत्र समोर आले आहे. हा पूल तात्पुरती दुरुस्ती करून खुला करू, असे ओरेवा कंपनीने

### काँग्रेसकडून न्यायालयीन चौकशीची मागणी

**मोरबी पूल दुर्घटनेच्या न्यायालयीन चौकशीची मागणी काँग्रेसने केली आहे. मोरबी पूल दुर्घटनेतील 135 जणांच्या मृत्यूला नेमके कोण जबाबदार आहे, हे समोर आणावे लागेल, असे ट्विट खरगे यांनी केले. पालिका, ओरवा कंपनी तसेच संबंधित अधिकाऱ्यांची सखोलचौकशी झाली पाहिजे. सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली ही कालबद्ध चौकशी व्हायला हवी, असे त्यांनी म्हटले आहे.**



या पत्रात म्हटले आहे. मात्र, प्रशासनाने या पत्राची तातडीने दखल घेतली नाही. तब्बल दोन वर्षांनी हा या कंपनीला कंत्राट दिले. आता प्रशासनाने कंत्राटी कंपनीला यासाठी जबाबदार धरले आहे. कायमस्वरुपी ठेक्यावरून वाद

पुलाच्या कंत्राटावरून ओरेवा कंपनी आणि जिल्हा प्रशासनात वाद सुरू होता, हे या पत्रावरून स्पष्ट होते. ओरेवा कंपनीला या पुलाच्या देखभालीसाठी कायमस्वरूपी कंत्राट हवे होते आणि त्यांनी तसे ते या पत्रात नमूद केले होते. कायमस्वरूपी कंत्राट मिळेपर्यंत पुलाची तात्पुरती डागडुजी सुरूच ठेवणार असल्याचे या कंपनी या पत्रात स्पष्ट केले होते. ओरेवा कंपनीच्या पुलाच्या दुरुस्तीसाठी साहित्य मागवणार नाही आणि कायमस्वरुपी ठेक्याच्या मागणीची पूर्तता झाल्यानंतरच ते काम पूर्ण करतील, असेही त्यात नमूद करण्यात आले आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, जानेवारी 2020मध्ये जारी केलेल्या या पत्रानंतर पुलाच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी ओरेवा कंपनीसोबत 15 वर्षांसाठी करार करण्यात आला होता. तथापि, हा करार मार्च 2022मध्ये करण्यात आला आणि तो 2037पर्यंत वैध आहे. तथापि, पूल दुर्घटनेनंतर मोरबी नगरपालिकेने या प्रकरणापासून हात झटकले आहेत. ओरेवा कंपनीने करारातील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याचा दावा पालिका अधिकारी संदीप सिंह यांनी केला आहे. पालिकेला न कळवता या कंपनीने पाच महिन्यांत पूल खुला केला होता. या पुलाबद्दल त्यांच्याकडून कोणतेही प्रमाणपत्र देण्यात आले नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

# ‘भारत जोडो यात्रे’त नितीन राऊत यांना धक्काबुक्की, डोळ्याला गंभीर दुखापत

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेली ‘भारत जोडो यात्रा’ भारत दौरा करत आहे. तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आंध्रप्रदेशातून ही यात्रा तेलंगणा राज्यात पोहचली आहे. काल (**



**१ नोव्हेंबर ) ही यात्रा हैदराबाद शहरात होती. यात्रेला भरघोस प्रतिसाद मिळत असल्याने अन्य राज्यातील नेतेही सामील होत आहेत. त्यातच राज्याचे माजी उर्जामंत्री नितीन राऊत सुद्धा तेलंगणातील यात्रेत सामील झाले होते. मात्र, यात्रेदरम्यान राऊत यांना दुखापत झाल्याचं समोर आलं आहे.**

‘भारत जोडो यात्रे’त सामील झाल्यानंतर नितीन राऊत यांना पोलिसांकडून धक्काबुक्की करण्यात आली. त्यामुळे ते खाली पडले आणि उजव्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली. तसेच, हात आणि पायालाही दुखापत झाल्याचं सांगितलं जात आहे. नितीन राऊत यांना तत्काळ उपचारासाठी हैदराबादमधील वासवी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. राऊत यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर काँग्रेसचे नवनिर्वाचित अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी भेट घेतली आहे. तसेच, राजेश लिलोथिआ, इम्रान प्रतापगडी, कन्हैया कुमार आणि तेलंगणाच्या काँग्रेस नेत्यांनी राऊत यांची भेट घेत विचारपूस केली आहे.


# नाना पाटेकरसह तापसी पन्नू दिसणार मुख्य भूमिकेत



कोविड काळात ओटीटी प्लॅटफॉर्मची चांगलीच चलती झाली. या ओटीटीवर येणाऱ्या कित्येक गोष्टी प्रेक्षक अगदी उत्सुकतेने पाहू लागले आणि हळूहळू तो कंटेंट बघणाऱ्या प्रेक्षकाच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली दिसून येत आहे. आंतरराष्ट्रीय कलाकृतींचा आस्वाद घ्यायला प्रेक्षकांनी सुरुवात केली त्याप्रमाणेच चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ न शकलेले चित्रपटही ओटीटीवर येऊ लागले.

असाच एक चित्रपट लवकरच आता झी५ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. एवढंच नाही तर हा चित्रपट एका मल्याळम चित्रपटाचा रिमेक आहे.नाना पाटेकर अभिनीत 'तडका' हा हिंदी चित्रपट लवकरच 'झी५'वर प्रदर्शित होणार आहे. नुकतंच या चित्रपटाचं पोस्टर सोशल मिडियावर शेअर करण्यात आलं असून नाना पाटेकर या चित्रपटात एका वेगळ्याच भूमिकेत दिसणार आहेत.

# नवरा जाऊन वर्षही झालं नाही आणि तू फिरतेयस" म्हणणाऱ्या युजरला मराठी अभिनेत्रीचं चोख उत्तर



नुकतीच मयुरी देशमुख व्हिएतनाम ट्रीपवर गेली असून कुटुंबीयांसह सुट्ट्या एन्जॉय करत आहे.

'खुलता कळी खुलेना' फेम अभिनेत्री मयुरी देशमुखच्या पतीने मागच्या वर्षी निधन झालं. आत्महत्या करत मयुरीच्या पतीने जीवन संपवलं. पती आशुतोषच्या जाण्याच्या धक्क्यातून अभिनेत्री मयुरी देशमुख स्वतः सावरण्याचा प्रयत्न करत पुन्हा जोमानं उभं राहण्याचा प्रयत्न करतेय. नुकतीच मयुरी देशमुख व्हिएतनाम ट्रीपवर गेली असून कुटुंबीयांसह सुट्ट्या एन्जॉय करत आहे. ज्याचे काही फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. पण एका युजरने यावरून मयुरीला ट्रोल करण्याचा प्रयत्न केला.

मयुरी देशमुखने तिच्या इन्स्टाग्रामवर व्हिएतनाम ट्रीपचे काही फोटो शेअर केले आहेत. या फोटोंवर कमेंट करताना एका युजरने मयुरीला ट्रोल करण्याचा प्रयत्न केला आहे. या युजरने मयुरीच्या फोटोवर कमेंट करताना तिच्या पतीच्या निधनाचा उल्लेख केला आहे. पतीच्या निधनाला वर्ष झालेलं नसतानाही तू फिरतेयस असं म्हणत या युजरने मयुरीवर टीका केली आहे. पण या युजरला मयुरीने चोख उत्तर दिलं आहे. मयुरीच्या फोटोवर कमेंट करताना युजरने लिहिलं, "अंग मयुरे नवरा स्वर्गवास होऊन एक वर्ष झालं नाही आणि तू फिरायला लागलीस, फोटो काढायला लागलीस, एन्जॉय करायला लागलीस." मयुरीने ही कमेंट तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर करताना लिहिलं, "जर आपण लोकांबद्दल विशिष्ट मत तयार न करता किंवा त्यांना जज न करता जगू दिलं तर हे जग खूप हेल्दी राहील." तिने पुढे लिहिलं, "स्वतःचा आनंद शोधणं सामान्य

# मृण्मयी आणि गौतमीचा नवा फिटनेस फंडा

मराठी चित्रपट सृष्टीमधील लोकप्रिय बहिणींची जोडी म्हणजे अभिनेत्री मृण्मयी देशपांडे आणि अभिनेत्री गौतमी देशपांडे या दोघीही बहिणी उत्तम अभिनेत्री आहेत. गौतमी आणि मृण्मयी या दोघी बहिणी सोशल मीडियावर खूप सक्रिय असतात. या दोन बहिणींची धमाल आणि मजा – मस्ती नेहमीच त्यांच्या चाहत्यांना पाहायला मिळत असते. त्यांचे व्हिडीओ सुद्धा सोशल मीडियावर खूप पहिले जातात. नुकताच मृण्मयीने गौतमीसोबतचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. या व्हिडीओ मध्ये दोघी बहिणी व्यायाम करताना दिसत आहेत. व्यायाम करत असलेला हा व्हिडीओ पाहून नेटकऱ्यांना मात्र गौतमीची दया आली आहे. या व्हिडीओ वर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया येत आहेत. गौतमी देशपांडे आणि मृण्मयी देशपांडे या दोन्ही बहिणी सोशल मीडियावर स्वतःचे व्हिडीओ आणि फोटो शेअर करत असतात. त्यांचे हे भन्नाट व्हिडीओ पाहून नेटकऱ्यांसोबतच सिने सृष्टीमधील अनेक कलाकार सुद्धा प्रतिक्रिया देत असतात. या बहिणींचे व्हिडीओ आणि त्यांची धमाल सुद्धा सोशल मीडियावर चर्चेत असतात. नुकताच अभिनेत्री आणि नृत्यांगना मृण्मयी देशपांडे हीने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवरून एक व्हिडीओ शेअर केला होता. त्यात मृण्मयी म्हणाली, की 'आरोग्याची काळजी घेत आपण नेहमी फिट राहिलं पाहिजे' त्यामुळे आता या बहिणी त्यांचा फिटनेस फंडा फॉलो करताना दिसत आहेत.



# डान्ससाठी काहीपण! रुबिना दिलैकने परिधान केला 'इतक्या' किलोचा घागरा

छोट्या पडद्यावरील एक अत्यंत लोकप्रिय कार्यक्रम म्हणजे 'झलक दिखला जा.' या कार्यक्रमाच्या या पर्वात नावाजलेले कलाकात स्पर्धक म्हणून सहभागी होऊन त्यांचे नृत्य कौशल्य दाखवत आहेत. अभिनेत्री रुबिना दिलैक सध्या 'झलक दिखला जा' या डान्स शोमुळे चर्चेत आहे. छोट्या पडद्यावरील या बहुचर्चित डान्स शोमध्ये तिने सहभाग घेतला. एकापेक्षा एक



जबरदस्त डान्स परफॉर्मन्स करत ती प्रेक्षकांप्रमाणेच या शोच्या परीक्षकांचं मन जिंकत आहे. नृत्यासाठी ती खूप मेहनत घेते. नृत्य उत्कृष्ट होण्यासाठी तिला काहीही करावं लागलं तरी ती मागे पुढे बघत नाही.

# अक्षय कुमारची मराठी सिनेसृष्टीत होणार ग्रँड एन्ट्री

बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारची मराठी सिनेसृष्टीत ग्रँड एन्ट्री होणार आहे. महाराष्ट्राचं आराध्य दैवत असलेल्या शिवाजी महाराजांची भूमिका तो साकारणार आहे. महेश मांजरेकर दिग्दर्शित 'वीर दौडले सात' या सिनेमात तो ही भूमिका साकारणार आहे. या मल्टीस्टारर सिनेमातील सर्व कलारांना बुधवारी एका शानदार सोहळ्यात समोर आणण्यात आलं. मराठी, तेलुगू, हिंदी भाषांमध्ये हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.

महेश मांजरेकर दिग्दर्शित 'वीर दौडले सात' या सिनेमाचा बुधवारी शुभारंभ झाला.



यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी राज ठाकरेंच्या हस्ते क्लॅप देऊन या सिनेमाच्या शुभारंभ करण्यात आला. वसिम कुरेशी यांनी या सिनेमाची निर्मिती केली आहे. याचे लेखक पराग कुलकर्णी आहेत तर संगीत हितेश मोडक यांनी दिलं आहे. गणेश आचार्य यामध्ये नृत्याची जबाबदारी सांभाळणार आहेत. लवकरच या सिनेमाच्या चित्रीकरणाला सुरुवात होणार आहे. पुढील वर्षी दिवाळीत हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.

# थोडक्यात बचावलो ; अनेक प्रश्न अजूनही अनुत्तरितच!

*दक्षिण आफ्रिके विरुद्ध पराभवाचा धक्का बसलेल्या भारतीय संघाचा सामना आज ऍडलेड ओव्हल ला बांगलादेश विरुद्ध झाला. स्पर्धेवर असणारे पावसाचे सावट आणि आफ्रिके विरुद्धचा पराभव यामुळे कुठलाही सामना सोप्यात घेणे भारतासाठी परवडणारे नव्हते. तुलनेने कमकुवत बांगला देश संघा विरुद्ध सामना असला तरी पावसाच्या शक्यतेमुळे बाद फेरी गाठण्यासाठी आजचा सामना जिंकणे आत्यावश्यक होते.*



विशेष

सुनील शाळगावकर
क्रिकेट प्रशिक्षक
9850217509

गेले दोन दिवस सतत पडणाऱ्या पावसाने आज काही काळ विश्रांती घेतली पण खेळपट्टी सतत कव्हर्ड असल्याने व्यवस्थित रोलिंग नसल्याने जरा हिरवी दिसत होती आणि ढगाळ वातावरणात सुरवातीला वेगवान गोलंदाजी ला साहाय्य करणारे हे स्पष्ट होते. बांगलादेश ने टॉस जिंकून अपेक्षेप्रमाणे क्षेत्ररक्षण स्वीकारले. भारताने हुडा ला वगळून अक्षर पटेल ला संघात घेतले. गोलंदाजाना अनुकूल अश्या वातावरणात राहुल आणि रोहित ने सावध सुरवात केली.ओलसर खेळपट्टी वर फलंदाज वारंवार चकत होते आणि त्यातच हसन मेहमूद ने फाईन लेग ला रोहित चा सोप्पा झेल सोडला पण त्याच हसन मेहमूद ने लगेचच स्वतःच्या गोलंदाजीवर अडखळणाऱ्या रोहित ला बाद करून सुटकेचा निश्वास सोडला आणि झेल सोडल्यावर रडवेल्या झालेल्या चेहऱ्यावर स्मितहस्य पसरले.सुरवातीला चाचपडणाऱ्या राहुल ने आधी स्कवेअर लेग आणि मग कव्हर्स वरून नेत्रदीपक षटकार मारून आपला आत्मविश्वास परत येत असल्याची चुणूक दाखवली.काही दिवसापूर्वी ज्याचे उत्कृष्ट फटके सुद्धा थेट क्षेत्रारक्षकांच्या हातात जात होते त्या विराट वर क्रिकेट देव आता मेहेरबान झाल्याने हवेत उडालेले फटके सुद्धा क्षेत्रारक्षकांना आरामात चकवत सीमापार होत होते.राहुल ने पण मग अचानक गियर बदलला आणि नवव्या षटकात चोवीस धावा वसुल केल्या. मात्र नंतर लगेचच तो एकतीस चेंडूत पन्नास धावा काढून बाद झाला.त्यानंतर भारताचा सध्याचा फलंदाजीचा सूर्य अवतारला आणि अचानक बांगलादेशी गोलंदाजी एखाद्या क्लब सारखी वाटायला लागली. मागच्या दहा डावात जेव्हा सूर्या नी अर्धशतक झळकावलंय तेव्हा त्याचा स्ट्राईक रेट दीडशे च्या वर आहे.झटपट तीस धावा करून फटकेबाजीच्या नादात तो बाद झाला आणि त्या पाठोपाठ हार्दिक आणि कार्तिक ही स्वस्तात परतले. फॉर्म मध्ये परतलेल्या विराट ने मात्र एक बाजू लावून धरत एकसष्ट धावांची वेगवान खेळी केली आणि भारताला एकशे चौऱ्याशी धावांचं आव्हान उभं करून दिलं. बांगलादेश कडून मोहम्मद हुसैन ने तीन बळी मिळवले आणि कर्णधार शाकिब ने ही अचूक गोलंदाजी केली. धावांचा पाठलाग करताना लिट्टन दास ने बांगला देश ला धमाकेदार सुरवात करून सहाव्या षटकातच स्वतःचे आणि संघांचे अर्धशतक धावफालकावर लावले आणि भारतीय खेळाडू आणि प्रेक्षकांना घाम फोडला.त्यातच वरुणराजाने अचानक हजेरी लावली आणि डकवार्थ लुईस स्कोर प्रमाणे बांगलादेश पंधरा रन्स पुढे होते.सुदैवाने पाऊस थांबला आणि बांगला देश ला एकशे एकावन्ना धावांचा लक्ष्य मिळालं. पावसा आधी भारतीय गोलंदाजी ची पिसं काढणारा लिट्टन दास लग्गेच बाद झाला आणि बांगलादेश ची पडझाड सुरु झाली.शेवटच्या षटकात वीस धावा हव्या असताना हसन ने अर्शदीप ला षटकार आणि चौकार मारून सामन्यात रंगत आणली मात्र अखेरीस भारत विजयी झाला आणि पराभवा पेक्षा जास्त घातक अश्या नागीन डान्स बघण्यापासून आणि अथर अली खान च्या बष्कळ बडबडी पासून भारतीय पाठीराखा्यांची सुटका झाली.अर्शदीप आणि हार्दिक ने दोन तर शमी ने एक बळी मिळवला.



# अवघ्या 8 वर्षांच्या गृहिताने सर केले अवघड 'माऊंट एव्हरेस्ट बेस कॅम्प'!

**मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था**




माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्पपर्यंतचा जगातील सर्वात उंच, कठीणात कठीण ट्रेक २८ ऑक्टोबर २०२२ रोजी गृहिता विचारे या छोट्या हिरकणीने यशस्वीरीत्या सर केला. माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्प गाठताना आणि ते ध्येय साध्य करण्यासाठी जी आव्हाने तिच्यासमोर होती ती म्हणजे, सरळ चढ असलेली शिखरं सर करणे, उणे अंश तापमानाशी झुंझ अर्थात शून्य अंश सेल्सिअस, थंडगार वारा, गोठलेले पाणी, ऑक्सिजनची घसरत जाणारी पातळी, कुठेही शेवट न दिसणारी अशी अंतहीन चढाई आणि आव्हानात्मक हवामानातील बदलांना तोंड द्यावे लागले. अशावेळी भल्याभल्यांना देखील घाम फुटतो, पण गृहिताकडे ती जिद्द होती. काहीही झालं तरी ते उंच टोक गाठायचं म्हणजे गाठायचच! अशी जिद्द उराशी बाळगून आपले वडील सचिन गंगाधर विचारेसह ती उंची तिने गाठली!

आजवर १०वर्षांच्या मुलीने ही उंची गाठण्याचा विक्रम केला होता! तिच्यापे प्रस्थारित क्षा दोन वर्षांने लहान गृहिताने हा विक्रम मोडीत काढत नवा विक्रम केला आहे! १३ दिवसांचा हा ट्रेक, जो काठमांडूपासून (समुद्र सपाटीपासून १४०० मीटर उंच) रामेछाप विमानतळापर्यंत ४ तासांचा आहे. रामेछाप ते लुक्ला विमानाने प्रवास (समुद्र सपाटीपासून २८४३मीटर उंचीवर) वास्तविक हा ट्रेक १४८ किमीचा आहे आणि लुक्ला (समुद्र सपाटीपासून २८४३ मीटर उंच) ते फाकडिंग (२६१० मीटर उंच) ते नामचे NAMCHE बाजार (३४४० मीटर) ते टिंगबोचे (३८६० मीटर) ते डिंगबोचे DINGBOCHE (४४१० मीटर) ते लोबुचे LOBUCHE(४९१० मीटर) ते गोरक्षेप GORAKSHEP (५१४० मीटर) ते कालापथर KALAPATHAR (५५५० मीटर) आणि अखेरीस मानाचा तुरा म्हणजेच एव्हरेस्ट बेस कॅम्प (५३६४ मीटर).

आता गृहिताचे वडील आपल्या लेकीसह लुक्लाकडे परतीच्या प्रवासाला निघाले आहेत जो सोमवारपर्यंत पूर्ण होणार असून ३ नोव्हेंबरला गृहिता मुंबईत येणार आहे.

# बांगलादेशविरुद्ध अर्धशतक करताच दिग्गज फलंदाजांच्या यादीत आता विराट कोहलीचे नाव

## विराट या दिग्गजांच्या यादीत सहभागी झाला आहे

**।ओडेन्से। महाईन्यूज । वृत्तसंस्था**

### आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक अर्धशतके करणारे फलंदाज

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक अर्धशतके करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर २१७ अर्धशतकांसह रिकी पॉटिंग आहे. तिसरा क्रमांक श्रीलंकन दिग्गज कुमार संगकाराचा आहे, ज्याने २१६ अर्धशतके केली आहेत. दक्षिण आफ्रिकेचा माजी दिग्गज अष्टपैलू जॅक कॅलीस आहे. कॅलिसने त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत एकूण २११ अर्धशतके केली आहेत. विराट कोहली ११९ अर्धशतकांसह या यादीत नव्याने सहभागी झाला आहे. २६४ – सचिन तेंडुलकर, २१७ – रिकी पॉटिंग, २१६ – कुमार संगकारा २११ – जॅक कॅलिस, ११९ – विराट कोहली

टी२० विश्वचषकात ग्रुप बी मध्ये भारत आणि बांगलादेश यांच्यात ॲडलेडमध्ये सामना खेळला गेला. अटीतटीच्या सामन्यात टीम इंडियाचा बांगलादेशवर पाच धावांनी निसटता विजय मिळवला असून उपांत्य फेरीतील आपले स्थान जवळपास निश्चित केले आहे. डकवर्थ लुईसच्या नियमानुसार धावांचे लक्ष हे १६ षटकात १५१ करण्यात आले होते. टीम इंडियाच्या गोलंदाजांनी शानदार गोलंदाजी करत भारताला विजय मिळवून दिला.

टी२० विश्वचषक सुरु झाल्यापासून विराट कोहली त्याच्या जुन्या फॉर्ममध्ये दिसत आहे. त्याने बांगलादेशविरुद्ध खेळताना नाबाद ६४ धावा करत खास विक्रमाची नोंद देखील केली. सचिन तेंडुलकर आणि रिकी पॉटिंग हे क्रिकेटविश्वातील महान फलंदाज आहेत. आता विराट या दिग्गजांच्या यादीत सहभागी झाला आहे. विराट कोहली आणि केएल राहुल यांनी बांगलादेशविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना दमदार अर्धशतके केली. राहुल टी२० विश्वचषकाच्या चालू हंगामात पहिल्या तीन सामन्यांमध्ये पूर्णपणे अपयशी ठरला होता. अशात बांगलादेशविरुद्धचे अर्धशतक त्याच्यासाठी अधिकच महत्वाचे ठरले. विराट कोहलीने मात्र विश्वचषक सुरू झाल्यापासून तिसरे अर्धशतक केले. विराटने पाकिस्तान आणि नेदरलँड्सविरुद्ध खेळताना नाबाद ८२ आणि ६२ धावा केल्या होत्या. अशातच आता त्याने बांगलादेशविरुद्ध ६४ धावांची नाबाद खेळी केली आणि दिग्गजांच्या यादीत सहभागी देखील झाला.



क्रिकेटचा देव आणि भारताचा महान फलंदाज सचिन तेंडुलकर याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अनेक मोठे विक्रम केले आहेत. सचिनचे अनेक विक्रम असेही आहेत, जे आजही अबाधित आहेत. असाच एक विक्रम म्हणजे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक वेळा ५० धावांपेक्षा मोठी खेळी करण्याचा. सचिनच्या नावावर सर्वाधिक २६४ वेळा ५० धावांपेक्षा मोठी खेळी केली आहे.

# भारताचा बांगलादेशवर पाच धावांनी विजय



**मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

टी२० विश्वचषकात ग्रुप बी मध्ये भारत आणि बांगलादेश यांच्यात ॲडलेडमध्ये सामना खेळला गेला. अटीतटीच्या सामन्यात टीम इंडियाचा बांगलादेशवर पाच धावांनी निसटता विजय झाला असून उपांत्य फेरीतील स्थान जवळपास निश्चित केले आहे. डकवर्थ लुईसच्या नियमानुसार धावांचे लक्ष हे १६ षटकात १५१ करण्यात आले होते. टीम इंडियाच्या गोलंदाजांनी शानदार गोलंदाजी करत भारताला विजय मिळवून दिला. विराट कोहलीला टी२० विश्वचषक २०२२ मध्ये दुसऱ्यांदा सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. बांगलादेशचा कर्णधार शकिब अल हसन याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.